RIGHT TO INFORMATION

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

दुरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ पिनॅकल मॉल, चौथा मजला, जुना आग्रा रोड, नाशिक – ४२२००२

ई-मेल – sicnashik@yahoo.com संकेतस्थळ – www.sic.maharashtra.gov.in

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(१) अन्वये दाखल तक्रार
क्रमांक- रामाआ-नाशिक/ तक्रार(प्रअ) ५५६/२०२०/नाशिक

श्री. एस. एस. शर्मा तक्रारकर्ता
चत्रभूज चाळ, शिरपूर, ता. शिरपूर, जि. धुळे.

विरूद्ध

पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय), नाशिक ग्रामिण, पोलीस मुख्यालय, भुजबळ नॉलज सिटी जवळ, आडगाव, नाशिक, ता. जि. नाशिक — जन माहिती अधिकारी

अपर पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामिण, पोलीस मुख्यालय, भुजबळ नॉलज सिटी जवळ, आडगाव, नाशिक, ता. जि. नाशिक — प्रथम अपिलीय अधिकारी

तपशिल

१	२	३	४	५
माहिती अर्जाचा दिनांक	प्रथम अपिल अर्जाचा दिनांक	प्रथम अपिलामध्ये पारीत निर्णयाचा दिनांक	तक्रार अर्जाचा दिनांक	तक्रार प्राप्त झाल्याचा दिनांक
१०-०२-२०२०	०८-०६-२०२०	२८-०९-२०२०	०८-१०-२०२०	१३-१०-२०२०

विवेचन

तक्रारकर्ता श्री. एस. एस. शर्मा यांनी प्रथम अपिलातील निर्णयानुसार अद्याप माहिती मिळाली नाही म्हणून आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८(१) मधील तरतुदीनुसार तक्रार अर्ज दाखल केला आहे.

२. या संदभातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार यांनी उक्त तपशिलात नमूद केलेल्या माहिती अर्जान्वये माहिती मागितली होती. या माहिती अर्जासंदर्भात प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे दाखल करण्यात आलेल्या प्रथम अपिलामध्ये प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी आदेश पारीत करुन खालीलप्रमाणे आदेशित केले आहे.

दिनांक ०८/०२/२०२० रोजी सादर केलेल्या तक्रार अर्जाचा कार्यालयातील अभिलेखावर कसुन शोध घेवून केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी.

३. श्री.शामकुमार निपूंगे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय), नाशिक ग्रामिण, पोलीस मुख्यालय, भुजबळ नॉलज सिटी जवळ, आडगाव, नाशिक, ता. जि. नाशिक यांनी प्रथम अपिलीय अधिकाऱ्याच्या आदेशानुसार तक्रारकर्त्यास अद्यापही माहिती दिली नसल्याची प्राथमिकरित्या आयोगाची खात्री झालेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहेत.

आदेश

श्री.शामकुमार निपूंगे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय), नाशिक ग्रामिण, पोलीस मुख्यालय, भुजबळ नॉलज सिटी जवळ, आडगाव, नाशिक, ता. जि. नाशिक यांनी तक्रारकर्त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन दाखल झालेल्या प्रथम अपिलामध्ये प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने तक्रारकर्त्यांना अद्यापही माहिती दिलेली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसात त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची कृपया नोंद घ्यावी.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(के. एल. बिश्नोई)
राज्य माहिती आयुक्त,
खडपीठ नाशिक

स्थळ - नाशिक
दिनांक : 23 JUL 2021

प्रति,
श्री.शामकुमार निपूंगे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय), नाशिक ग्रामिण, पोलीस मुख्यालय, भुजबळ नॉलज सिटी जवळ, आडगाव, नाशिक, ता. जि. नाशिक

प्रत,
पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामिण, पोलीस मुख्यालय, भुजबळ नॉलज सिटी जवळ, आडगाव, नाशिक, ता. जि. नाशिक
यांना माहितीस्तव आणि उपरोक्त आदेशानुसार संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना आयोगास खुलासा सादर करण्याबाबत आपल्या स्तरावर सुचना देण्याकरीता अग्रेषित